महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहसंचालक संवर्गातील अधिकारी यांच्या प्रशासकीय बदल्यांबाबत.

Trans DAT

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग,
शासन आदेश:- बदली २०१७/प्र.क्र.७८/कोषा प्रशा-२
मंत्रालय, मुंबई ४०००३२. दिनांक २९ मे २०१७

**शासन आदेश**:- महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहसंचालक संवर्गातील आणि वेतनश्रेणी रुपये १५६००-३९१०० अधिक ग्रेड पे ७६००/- या वेतनश्रेणीतील खालील विवरणपत्रात नमुद सहसंचालक यांना सध्याच्या पदावर तीन वर्षे कालावधी पूर्ण झाला आहे. त्यामुळे त्यांची महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम - २००५ मधील तरतुदीनुसार खालील विवरणपत्रातील स्तंभ क्र.3 मध्ये नमूद पदावर प्रशासकीय बदली करण्यात येत आहे.

| अ. क्र. | अधिकाऱ्यांचे नाव<br>पदनाम व सध्याचे कार्यालय व ठिकाण | बदली करण्यात येत असलेले पद, कार्यालय व ठिकाण |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | श्री. उत्तम नारायणराव सोनकांबळे<br>सहसंचालक<br>सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा यांचे कार्यालय, नाशिक | सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती विभाग,अमरावती |
| २ | श्री. जितेंद्र राजाराम इंगळे<br>सहसंचालक (संगणक)<br>संचालनालय लेखा व कोषागारे, मुंबई शहर | प्रशासकीय कारणास्तव १ वर्ष मुदतवाढ. |
| ३ | श्री. बाळासाहेब रामनाथ घोरपडे<br>सहसंचालक, लेखा व कोषागारे, नाशिक विभाग यांचे कार्यालय, नाशिक | सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा यांचे कार्यालय, नाशिक |

| अ. क्र. | अधिकाऱ्यांचे नाव<br>पदनाम व सध्याचे कार्यालय व ठिकाण | बदली करण्यात येत असलेले पद, कार्यालय व ठिकाण |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| ४ | श्री. मंदार मधुकर पोहोरे<br>उप सचिव तथा सहसंचालक<br>भुकंप पुनर्वसन कक्ष, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई शहर | सहसंचालक (वित्त व लेखा)<br>पोलीस महासंचालनालय,मुंबई शहर |
| ५ | श्रीमती ज्युडी जेकब झकारीया<br>उपआयुक्त दुग्ध व्यवसाय व वित्तीय सल्लागार आयुक्त दुग्ध व्यवसाय विकास कार्यालय, वरळी, मुंबई शहर | सेवानिवृत्तीसाठी एक वर्षापेक्षा कमी कालावधी शिल्लक असल्याने कार्यरत पदावर मुदतवाढ. |
| ६ | श्री. लक्ष्मण माधवराव पाटील<br>सहसंचालक, लेखा व कोषागारे, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | सहसंचालक, लेखा व कोषागारे, नाशिक विभाग यांचे कार्यालय,नाशिक |
| ७ | श्री. मनेष विश्वनाथराव वाघीरकर<br>सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, औरंगाबाद | वित्तीय नियंत्रक<br>महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, मुंबई शहर |
| ८ | श्री. सुरेश दादासाहेब सारंगकर<br>वित्तीय नियंत्रक<br>महाराष्ट्र मेरी टाईम बोर्ड, मुंबई शहर | उप सचिव तथा सहसंचालक<br>भुकंप पुनर्वसन कक्ष, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई शहर |

२. वरीलप्रमाणे बदली झालेल्या अधिका-यांच्या नियंत्रक अधिका-यांनी बदली अधिका-याची प्रतिक्षा न करता स्थानिक व्यवस्था करुन संबंधित अधिका-यांस तात्काळ कार्यमुक्त करावे.

३. वरीलप्रमाणे बदली झालेल्या अधिका-यांनी त्यांच्या नियंत्रक अधिका-यांच्या सल्ल्याने सध्याच्या पदावरुन कार्यमुक्त व्हावे आणि बदली झालेल्या पदावर रुजू व्हावे. बदलीच्या ठिकाणी हजर होताच शासनास तसेच संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांना अवगत करावे.

४. वरील अधिका-यांनी त्यांचे नवीन पदाचा कार्यभार स्विकारताच त्यांचे वैयक्तिक माहितीचा तपशिल HRMS मधील नमुन्यात भरुन नवीन कार्यालय प्रमुखांमार्फत संचालनालयास सादर करावा तसेच सर्व अधिका-यांनी संचालनालयाने विकसीत केलेल्या मानव संसाधन व्यवस्थापन प्रणालीमध्ये विहित नमुन्यातील माहिती भरुन संगणक प्रणालीद्वारेच रुजू अहवाल देणे बंधनकारक राहील.